# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

## राज्यातील कायम विना तथा अंशत: अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतरांना १०० टक्के वेतन देण्याबाबत

**(१) १३९८० (२५-०८-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित धोरण दिनांक २४ जुलै, २००९ रोजीच्या निर्णयाद्वारे रद्द करण्यात आल्यामुळे कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या शाळांना वेतन अनुदान देण्याच्या उद्देशाने शाळांचे मुल्यांकन करण्यात आले असून, मूल्यांकन अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना २० टक्के अनुदान देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शाळांचे मुल्यांकन झाले त्या शाळांना अघोषित स्थितीत ठेवण्यात आले असून काही शाळांना त्रुटी पुर्तता करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांचे प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले असून सदरहू प्रकरणी शासनाच्या शिक्षक हित विरोधी धोरणामुळे शिक्षक/कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याने सातत्याने आंदोलने करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक २०/०५/२०२२ रोजी शासनास पत्र पाठवून १०० टक्के वेतन देण्याबाबत निर्णय घेण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०७-१०-२०२५) :** (१) कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या शाळांना वेतन अनुदान अदा करण्याबाबतचे धोरण शासन निर्णय दिनांक १५/११/२०११, दिनांक १६/७/२०१३, दिनांक ४/६/२०१४ व दिनांक १४/८/२०१४ अन्वये निश्चित करण्यात आले असून, या धोरणातील तरतूदींनुसार मुल्यांकनात पात्र झालेल्या शाळांना वेळोवेळी टप्पा अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

(२), (३), (४) व (५) वेतन अनुदानाच्या स्थायी आदेशांमधील निकषांनुसार मुल्यांकनात पात्र झालेल्या शाळांना अनुदान अनुज्ञेय होते. निकषांनुसार अपात्र शाळांना त्रुटीपूर्तता करण्याची मुभा आहे. शासनाच्या स्थायी आदेशांनुसार सरसकट १०० टक्के अनुदान अनुज्ञेय नाही.

---

## सोलापूर महानगरपालिकेच्या महात्मा गांधी प्राणी संग्रहालयास मान्यता मिळण्याबाबत

**(२) १५८६१ (२९-१२-२०२२) श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेच्या महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाचा नव्याने मान्यतेचा प्रस्ताव केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाकडे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केंद्रीय प्राणी संग्रहालय आणि प्राधिकरणांकडून सदर प्राणी संग्रहालयास मान्यता मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रस्ताव केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडे मान्यतेसाठी दिनांक १५/०१/२०२२ रोजी सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उन्हवरे व वावघर (ता.दापोली जि.रत्नागिरी) रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरण्याबाबतत

**(३) १९०३८ (०४-०८-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यातील (जि.रत्नागिरी) उन्हवरे येथील पोलीस पाटील हे पद राजीनामा दिल्याने तर वावघर येथील पोलीस पाटील पद हे निवृत्त झाल्याने सदर दोनही पदे मागील अनेक वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्हवरे येथे गरम पाण्याची कुंड असल्याने पर्यटन केंद्र म्हणून प्रसिध्द असलेल्या याठिकाणी पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते तसेच उन्हवरे गावामध्ये सध्या भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण वाढत असून ग्रामपंचायतीने उन्हवरे बाजारपेठ येथे बसविलेले सीसीटीव्ही कॅमेरेही या चोरट्यांनी पळविले असल्याने येथील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून फरारे येथील पोलीस पाटील यांचेकडे उन्हेवरे व वावघर या दोन्ही गावांचा कार्यभार देण्यात आला तरी तिन्ही गावांचे कामकाज सांभाळणे जिकीरीचे असल्याने उन्हवरे व वावघर या दोन्हीही गावातील पोलीस पाटीलांची रिक्त पदे विनाविलंब भरण्यात यावीत अशी मागणी मागील २ वर्षापासून येथील ग्रामस्थांनी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी, रत्नागिरी, जिल्हा पोलीस प्रमुख रत्नागिरी इ.कडे सातत्याने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने अद्यापी उन्हवरे व वावघर गावातील पोलीस पाटीलांची रिक्त पदे विनाविलंब भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सी.सी.टी.व्ही. व चोरी नुकसानी प्रकरणी सरपंच ग्रामपंचायत उन्हवरे, तालुका दापोली यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन अज्ञान ईसमाविरुध्द दापोली पोलीस ठाणे गुन्हा रजिष्टर नंबर २०९/२०२२ भा.दं.वि.सं, कलम ३७९, ४२७ प्रमाणे दिनांक २८/१२/२०२२ रोजी १८.३४ वाजता दाखल आहे.

उन्हवरे व वावघर गावातील रिक्त पोलीस पाटील पदे भरण्यात यावीत या आशयाचे ग्रामस्थांकडून अर्ज प्राप्त झाले नसल्याचे जिल्हाधिकारी, रत्नागिरी व पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांनी कळविले आहे.

(३) उप विभागीय अधिकारी, दापोली व जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या स्तरावर उन्हवरे व वावघर या दोन्ही गावासोबत दापोली उपविभागातील एकूण १६७ पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली असून दिनांक ०४/०९/२०२३ रोजी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आलेला होता असे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माहिती प्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोंबिवली,कल्याण मधील विविध भागात बनावट पर्यटन कंपनीच्या प्रवर्तकांनी तीन महिलांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(४) २०२१५ (०४-०८-२०२३) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली,कल्याण मधील तीन महिलांची एका बनावट पर्यटन कंपनीच्या प्रवर्तकांनी एक लाख २० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे नुकतेच माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकरणी टिळकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून कल्याणमध्ये राहणाऱ्या महिलेनेदेखील यासंदर्भात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने सदर पर्यटन कंपनीकडून रक्कम वसूल करून त्याचेवर फसवणुकीबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी कल्याण येथे राहणाऱ्या महिलेने टिळकनगर पोलीस ठाणे (डोंबिवली) येथे तक्रार दाखल केली आहे. त्याअनुषंगाने टिळकनगर पोलीस ठाणे (डोंबिवली) येथे दिनांक ०६/०५/२०२३ रोजी गु.र.क्रं. ९५/२०२३, भादंवि कलम ४२० सह माहिती तंत्रज्ञान अधिनीयम २००८ चे सुधारित कलम ६६ (सी), ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्हयात दोन आरोपी अटक असून मा.न्यायालयात दिनांक ३०/०९/२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्याचा आर.सी.सी.नं. ८४४/२३ दिनांक ०५/१०/२०२३ असा असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

---

## मरोळ पोलीस कॅम्पच्या परिसरातील व्यसनाधिनांवर कारवाई करण्याबाबत

**(५) २०५७७ (०४-०८-२०२३) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मरोळ पोलीस कॅम्पच्या आसपास असलेल्या कनाकिया रेन फॉरेस्ट, भवानी नगर, संगीतकार श्रीकांत ठाकरे मार्ग, भारतवन उद्यान ते कस्टम कॉलनी परिसरात व्यसनाधिनांचा वावर सुरू असून नागरिक त्रस्त झाले आहेत, हे खरे आहेत काय,
(२) असल्यास, पवई पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या पवई उद्यान बीट क्रमांक १ चौकीच्या परिसरात अशा प्रकारांना आळा बसण्यासाठी पोलीस बीट चौकी सुरू करण्याची मागणी तेथील जनतेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई मरोळ पोलीस कॅम्पच्या आसपास असलेल्या कनाकिया रेन फॉरेस्ट, भवानी नगर, संगीतकार श्रीकांत ठाकरे मार्ग, भारतवन उद्यान ते कस्टम कॉलनी परिसरातील व्यसनाधिनांवर कारवाई करण्याबाबत तसेच पोलीस बीट चौकी सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२५) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी पवई पोलीस ठाणे येथे दिनांक १८/०५/२०२३ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.
(३) मरोळ पोलीस कँम्पच्या आसपास एकूण १२ क्युआर कोड लावण्यात आले असून त्याव्दारे सर्व गस्ती वाहनांवरील अधिकारी व अंमलदार दिवस व रात्र कर्तव्य काळात समक्ष जावुन मोबाईलव्दारे क्युआर कोड स्कॅन करतात. त्यामुळे पोलीसांची सदर ठिकाणी नियमितपणे गस्त होते. व सदर परिरात निगराणी राहते. परंतु सदर परिसरात अशा प्रकारची कोणतीही व्यसनाधीनतेची घटना घडून आल्याचे निदर्शनास आले नाही.

तसेच मुंबई मरोळ पोलीस कॅम्पच्या आसपास असलेल्या कनाकिया रेन फॉरेस्ट, भवानी नगर संगीतकार श्रीकांत ठाकरे मार्ग, भातरवन उद्यान ते कस्टम कॉलनी येथे राहणाऱ्या नागरीकांनी त्यांना एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे जास्त सोईस्कर असल्याने सदर भाग एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे हद्दित समाविष्ठ करण्याची मागणी केली आहे. त्यानुषंगाने पवई पोलीस ठाणेकडून दिनांक २७/०९/२०२३ रोजीचे पत्र पोलीस उप आयुक्त (अभियान), पोलीस आयुक्त (का.व सु), मुंबई यांच्या कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदरचा अहवाल पुढील कार्यवाहीस्तव अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई कार्यालयास पाठविण्यात आला आहे.
(४) लागु नाही.

---

## राज्यातील प्रत्येक नाट्यगृहात सौर उर्जेवर आधारित यंत्रणा बसविण्याबाबत

**(६) २०७०२ (०८-०८-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील अनेक नाट्यगृहांची अपुरी ध्वनी यंत्रणा, पुरेशा प्रकाश व्यवस्थेचा अभाव, उत्पन्न कमी असतानाही अदा करावी लागणारी अवाजवी वीज देयके, अपुरी आसन व्यवस्था,अस्वच्छतेमुळे झालेली दुरवस्था अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष यांनी निदर्शनास आणून राज्यातील प्रत्येक नाट्यगृहात सौर उर्जेवर आधारित यंत्रणा (सोलर सिस्टीम) बसविण्याबाबतची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री आणि मा.सांस्कृतिक कार्य मंत्री महोदयांकडे दिनांक २१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास

केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने राज्यातील नाट्यगृहांची दुरवस्था दूर करून प्रत्येक नाट्यगृहात सौर उर्जेवर आधारित यंत्रणा (सोलर सिस्टीम) बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०९-२०२५) :** (१), (२), व (३) वैशिष्टयपूर्ण / मूलभूत सोईसुविधा योजनेंतर्गत महानगरपालिका व नगरपरिषदेच्या नाट्यगृहामध्ये सौर उर्जेवर आधारित यंत्रणा (सोलर सिस्टिम) बसविणेबाबत प्राप्त होणारे प्रस्ताव तसेच मंजूर अर्थसंकल्पीत निधी यांचा विचार करून सदर प्रकरणी निधी मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येते.

तसेच सर्व नागरी स्थानिक स्वराज संस्थांना नाट्यगृहांची नियमित दैनंदिन देखभाल, दुरुस्ती करण्याच्या व नाट्यगृहे सुसुस्थितीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

---

## डोंबिवलीतील जोंधळे शाळेतील १० ते १२ विद्यार्थ्यांना शिक्षिकेने मारहाण केल्याबाबत

**(७) २१०८८ (०५-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली, (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील जोंधळे शाळेतील १० ते १२ विद्यार्थ्यांनी शिक्षिकेने शिकवलेले समजले नसल्यामुळे पुन्हा शिकविण्याची विनंती केली असता सदर शिक्षिकेने त्यांना पट्टीने मारहाण केली असल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मारहाण करणाऱ्या शिक्षिकेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१०-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) चौकशीअंती शिक्षिकेस बडतर्फ करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यात पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(८) २११४९ (०४-०१-२०२४) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यात पत्रकारांवर हल्ले करण्यात येत असून त्याला आळा घालण्यासाठी पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी दिनांक १९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यादरम्यान सातारा जिल्हा मराठी पत्रकार संघ व कोरेगाव तालुका मराठी पत्रकार संघांच्यावतीने कोरेगाव तहसिल कार्यालयाकडे निवेदन शासनाकडे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पत्रकारांवर होत असलेले हल्ले रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२५) :** (१) होय, दिनांक १७/०८/२०२३ रोजी १२.४० ते १३.०० वा. चे दरम्यान श्री.हणमंतराव शिवाजीराव बर्गे रा. कोरेगांव अध्यक्ष, कोरेगांव तालुका मराठी पत्रकार संघ यांचे नेतृत्वाखाली पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांचा निषेध करण्यासाठी सातारा जिल्हा पत्रकार संघ व कोरेगांव तालुका पत्रकार संघाच्यावतीने कोरेगाव तहसिल कार्यालयासमोर पत्रकार संरक्षण कायद्याची होळी व निदर्शन करण्यात आले व तहसिलदार, कोरेगांव यांना निवेदन देण्यात आले.
(२) सन २०२२ मध्ये वाई विभागातील मेढा पोलीस ठाणेस गुन्हा रजिस्टर नं. २२९/२०२२ महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था (हिंसा आणि मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध) अधिनियम २०१७ कलम ३, ४, भा.दं.वि. स कलम ५०६ अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा दिनांक २९/०३/२०२३ रोजी मा.न्यायालय,मेढा येथे दोषारोपपत्र सादर केले आहे. अशा प्रकारे पत्रकारांवर हल्ले करणाऱ्या इसमांविरूध्द प्रचलित कायद्यान्वये कारवाई केली जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(९) २११७० (०४-०१-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौंडी (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथे सुरेश बंडगर यांनी २० दिवसांपासून उपोषण सुरू केले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाकडून कुठलेही आश्वासन न मिळाल्याने उपोषणकर्त्यांसह राज्यभरातील धनगर समाजाने आक्रमक भूमिका घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०३-०९-२०२५) :** (१), (२), (३) व (४) धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करुन त्यांना आरक्षणाचा लाभ देण्याच्या मागणीकरीता चौंडी, जि.अहिल्यानगर येथे धनगर समाजातील प्रतिनिधी उपोषणास बसले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली होती. त्यानुषंगाने, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली धनगर समाजाच्या शिष्टमंडळासमवेत दिनांक २१/०९/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या निर्देशास अनुसरुन, राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण / लाभ देण्याच्या मागणीच्या अनुषंगाने मध्य प्रदेश, बिहार व तेलंगणा या राज्यांनी त्यांच्या अधिकारामध्ये त्या राज्यातील जातनिहाय यादीमध्ये समावेश असलेल्या जाती/जमातींना जात प्रमाणपत्र तसेच अन्य लाभ उपलब्ध करुन देण्याबाबत अवलंबिलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग,

दिनांक २०/११/२०२३ अन्वये डॉ.सुधाकर शिंदे (भारतीय राजस्व सेवा) यांचे अध्यक्षतेखाली शिष्टमंडळ /अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे.

---

## राज्यातील धोकादायक इमारतीच्या मालकांना नोटीस दिल्याबाबत

**(१०) २१७५० (०५-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील भुसावळ शहरात जुन्या व जीर्ण झालेल्या इमारती मोठ्या प्रमाणात असून सदर इमारती धोकादायक झाल्याने पालिकेने या इमारतीच्या मालकांना इमारतीत राहू नये, त्या पाडाव्यात अशी नोटीस दिली असल्याची बाब माहे सप्टेंबर २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या इमारतीची दखल मालकांनी न घेतल्यास दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी सदर धोकादायक इमारती जमीनदोस्त करण्याचा निर्णय नगरपालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींचा प्रश्न गेल्या १५ वर्षापासून सातत्याने समोर येत असून महानगरपालिका प्रशासनाने शहरातील धोकादायक इमारतींची यादी जाहीर करून ३० वर्षाहून जुन्या इमारतींचे संरचना परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करून घेण्याचे आवाहन केले होते अन्यथा २५ हजार रुपये दंड ठोठावण्याचा इशारा देखील देण्यात आल्याचे दिनांक २७/०८/२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार किती धोकादायक इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे व किती इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत, तसेच या मालकांना नव्याने इमारती उभ्या करण्यासाठी पालिका सवलत देऊन एफएसआय वाढवून देणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जर रहिवाशी धोकादायक इमारत सोडण्यास तयार नसतील तर प्रशासनाने या इमारती रिकाम्या करण्यासाठी कठोर भूमिका घेणे गरजेचे असून शहरातील धोकादायक इमारतीवर कारवाई करण्यास महानगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत शासनाकडून काय भूमिका घेण्यात आली आहे वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०८-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे,

भुसावळ नगरपरिषदेमार्फत धोकादायक इमारतींच्या मालकांना इमारत पाडण्यास व धोकादायक भाग काढून घेण्याबाबत माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये नोटीस देण्यात आली आहे.

तथापि, इमारत जमिनदोस्त करण्याचा अद्याप अंतिम निर्णय नगरपरिषदेमार्फत घेण्यात आलेला नाही.

(२) हे खरे आहे,

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतींच्या बांधकामास ३० वर्ष पूर्ण झाले आहेत, त्या इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करण्याबाबत वृत्तपत्रात जाहीर आवाहन करण्यात आले आहे. सदर आवाहन दर ६ महिन्यांत जनजागृतीसाठी वृत्तपत्रात, तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते.

(३) नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण ५२७ धोकादायक इमारती घोषित करण्यात आल्या आहेत. त्यातील ६३ इमारती अतिधोकादायक घोषित केल्या असून त्यापैकी २० इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत.

तसेच, शासनाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. १०/१०/२ तसेच नियम क्र/०७/६ नुसार मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत अनुक्रमे सिडको विकसीत इमारती व खाजगी विकासकामार्फत बांधण्यात आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीबाबत तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबतची कार्यवाही करण्यात येते.

(४) नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या ६३ इमारतींपैकी २० इमारतींचा रहिवास वापर बंद करण्यात आला असून, उर्वरित ४३ अतिधोकादायक इमारतींचा पाणीपुरवठा व विज पुरवठा खंडीत करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका व इतर यंत्रणांमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई (मालाड) येथील कुरार व्हिलेज परिसरात सिलिंडरमध्ये धोकादायकरित्या गॅस भरण्यात येत असल्याबाबत

**(११) २२१५९ (०५-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई (मालाड) येथील कुरार व्हिलेज परिसरात मोठ्या सिलिंडरमधून छोट्या सिलिंडरमध्ये धोकादायकरित्या गॅस भरण्याचे प्रकार सुरू असल्याची बाब दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या बेकायदेशीर कामामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्त हानी होण्याची शक्यता भावना असून देखील त्यांच्यावर कायद्याचा वचक बसलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्यासाठी व बेकायदेशीर प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

कुरार पोलीस ठाणे हद्दीतील रुम नं.३७, आदर्श सेवा संघ चाळ, कुरार व्हिलेज, मालाड पूर्व येथे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी आग लागल्याची घटना निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणी कुरार पोलीस ठाणे येथे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी गु.र.क्र.६१४/२०२३ भा.दं.वि. कलम २८५, ३३६ सह दी लिक्वीफाईड पेट्रालीयम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर २००० कलम ३ (४),४,५,६,७ सह जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ कलम ३,७अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) अशा प्रकारच्या घटनांसंदर्भात स्थानिक पोलीस ठाण्याकडून त्वरीत गुन्हा दाखल करून संबधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(३) सदर प्रकरणी कुरार पोलीस ठाणे येथे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी गु.र.क्र.६१४/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचे अंतिम दोषारोपपत्र दिनांक १०/०७/२०२४ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ६७ वे न्यायालय, बोरीवली (प.), मुंबई येथे सादर केले असून त्याचा कोर्ट केस क्रमांक ६७०३०८३/२०२४ असा आहे.

सदर गुन्हयातील आरोपी मोठ्या गॅस सिलींडर मधून लहान गॅस सिलींडरमध्ये गॅस भरतांना आढळून आले आहेत. त्यानुसार आरोपींवर गुन्हा दाखल केलेला असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अशा घटना परत आढळून आल्यास तात्काळ पोलीसांना कळविण्यात यावे असे आवाहन तेथील नागरीकांना केले आहे. तसेच गुप्त बातमीदार यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. पोलीस अधिकारी / अंमलदार, बीट मार्शल, मोबाईल वाहने यांना पोलीस ठाणे हद्दीत गस्त करून तपासणी करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. गॅस वितरण कंपन्या, गॅस वितरण केंद्रे यामध्ये समन्वय साधून अशा घटनांना प्रतिबंध करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोवंडी (मुंबई) येथील ओव्हरब्रीजच्या रस्ता रूंदीकरण / बांधकामात बाधित झालेल्या गाळेधारकांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने पुनर्वसन न केल्याबाबत

**(१२) २२७९५ (०५-०१-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) येथील ओव्हरब्रीज रस्ता रूंदीकरण / बांधकामासाठी या परिसरातील ९ गाळेधारकांच्या गाळयांची जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन १९६९-७० मध्ये ताब्यात घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संपादीत जागेच्या मोबदल्यात संबंधित ९ गाळेधारकांना बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने अन्य ठिकाणी जागा उपलब्ध करून न दिल्याने संबंधित गाळेधारकांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला असता, मा.उच्च न्यायालयाने संबंधित गाळेधारकांचे तातडीने पुनर्वसन करुन त्यांना जागा वाटप करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे बृहन्मुंबई महानरपालिकेकडून पालन करण्यात आले नसून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून याप्रकरणी जाणीवपूर्वक विलंब करण्यात येत असल्यामुळे सद्य:स्थितीत सदरहू गाळेधारक हे त्यांच्या हक्काच्या गाळयांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित गाळेधारकांना त्यांच्या हक्काच्या जागा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच गाळेधारकांचे पुनर्वसन करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०९-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील बापु (सागर) निकुंबे यांच्या कुंटुंबियांना देण्यात येत असलेल्या धमकीबाबत

**(१३) २२८६७ (०९-०१-२०२४) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील नेपच्यून को.ऑ. हौ.सो ओटी नं-३ येथे वास्तव्यास असलेले बापु (सागर) निकुंबे यांच्या कुंटुंबियांना जमिनीच्या व्यवहाराच्या कारणावरुन गजानन देवराव मढवी व देविदास मढवी यांनी जमीन खरेदी न करता त्यांना ५० लाख रुपयांचा अग्रिम देण्यात यावा नाहीतर जीवे मारण्यात येईल अशी धमकी देऊन वारंवार पैशांची मागणी करित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून याबाबत उल्हासनगर पोलीस स्टेशनमध्ये श्री.निकुंबे यांनी लेखी तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गजानन देवराव मढवी व देविदास मढवी हे गुंड प्रवृतीचे असून जमीन खरेदी न करता ५० लाख रुपयांच्या अग्रिमांची मागणी करीत असून बापू निकुंबे व त्यांच्या कुंटुंबियास ते अनुसूचित जातीचे असल्यामुळे त्यांच्या जीवीतास मढवी कुटुंबियांकडून धोका निर्माण झाला असल्याने पोलिसांनी मढवी कुंटुंबियांविरुध्द गुन्हा नोंदवून कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०२५) :** (१) होय,

यासंदर्भातील तक्रार दिनांक १२/१२/२०२३ रोजी मध्यवर्ती पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी अर्जदार श्री बापु निकुंबे यांनी सध्या गैरअर्जदार गजानन देवराम मढवी व त्याचा मुलगा देवीदास गजानन मढवी यांच्याकडुन त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत नसल्याचा जबाब नोंदविण्यात आल्याने दिनांक ३१/१२/२०२३ रोजी सदरचा अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा भाईंदर महानगरपालिकेने ओला व सुका कचरा वेचण्याचा ठेका ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि या कंपनीस दिल्याबाबत

**(१४) २२८८३ (१०-०४-२०२४) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिनांक २६ एप्रिल, २०१२ रोजी महानगरपालिकेच्या हददीतील ओला व सुका कचरा वेचण्याचा ठेका ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि या कंपनीला दिला असून, सदरहू ठेका करारानुसार ५ वर्षासाठी झालेला असतानाही तो पुढील १२ वर्षासाठी वाढविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्भया प्रचारक या मराठी साप्ताहिकाच्या संपादकांनी दिनांक ७ जून, २०२३ रोजी माहितीच्या अधिकारान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून उक्त कंपनीबाबत माहिती मागविली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहितीच्या अधिकारात माहिती मिळाल्यानुसार उक्त ठेक्याच्या कालावधीत सदरहू कंपनीमार्फत करण्यात आलेल्या एकूण रुपये १८१ कोटी, ९९ लाख, ५१ हजार, ६० रुपयाच्या झालेल्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी निर्भया प्रचारकच्या संपादकांनी तत्कालीन आयुक्त, मिरा – भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे तक्रार अर्ज दिला आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त ठेका वाढवून आर्थिक गैरव्यवहारास जबाबदार असणारी ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि कंपनी तसेच महानगर पालिकेचे आरोग्य अधिकारी आणि चुकीची बिले पास करणारे मुख्य लेखा अधिकारी व लेखापरिक्षक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०८-२०२५) :** (१) • मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील कचरा संकलन वाहतूक या कामाच्या मूळ निविदेचा कालावधी हा दिनांक ०१/०५/२०१२ ते दिनांक ३१/०४/२०१७ असा होता.

• तद्नंतर राबविलेल्या निविदे प्रक्रियेस प्रतिसाद न मिळणे, अत्यल्प प्रतिसाद मिळणे, निविदाधारक निविदापूर्व वाटाघाटीसाठी उपस्थित न राहणे, दरम्यान आलेल्या कोविड-१९ चा प्रादुर्भाव इत्यादी कारणे तसेच, सदरची सेवा अत्यावश्यक सेवा असल्याने, सदर निविदेस वेळोवेळी महासभेच्या मान्यतेनेदिनांक ०७/०७/२०२३ पर्यंत एकूण ६ वर्षासाठी मुदतवाढ दिल्या गेल्या, ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अशा आशयाची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली, ही वस्तुस्थिती आहे.
(४) सदर प्रकरणी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पडघा (जि.ठाणे) येथील मे. शिवम डेव्हलपर्स या विकासकाच्या निर्माणाधीन इमारतींचा अनधिकृत ताबा घेतल्याबाबत

**(१५) २२८८८ (१४-०६-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरूंद रोड, अर्जुनली, पोस्ट – पडघा (जि.ठाणे) येथील भूमापन क्र. २१, पो.हि. क्र. २ येथील निर्माणाधीन असलेल्या इमारतींचा स्थानिक जमीनमालक आणि त्यांच्या नातेवाईकांनी दादागिरी आणि कराराचा भंग करून अनधिकृतपणे अतिक्रमण करून बेकायदेशीर बांधकाम सुरू केले असल्याची लेखी तक्रार मे. शिवम डेव्हलपर्स या विकासकाने पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, तसेच पोलीस निरीक्षक, पडघा पोलीस ठाणे यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित विकासकास समाजकंटकांकडून सातत्याने जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरेआहे काय
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व

सदर प्रकरणातील दोषींवर तसेच तक्रारीचा तपास करण्यास दिरंगाई करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२५) :** (१) मे. शिवम डेव्हलपर्स आणि रामचंद्र कृष्णा कोर यांच्यात झालेल्या डेव्हलपमेंट करारानुसार जमीन मालकास देण्यात येणारे इमारत क्र.२ मधील क्षेत्रफळाबाबतचे दिनांक १७/७/२०१७ रोजीचे रामचंद्र कृष्णा कोर यांना उद्देशून लिहिलेले पत्र पडघा पोलीस ठाणे येथे दिनांक १३/०३/२०२४ रोजी प्राप्त झाले असून सदर पत्रातील नमूद बाब पोलीस विभागीशी संबंधित नसून सदरचे पत्र हे अर्जदार यांनी माहितीस्तव दिल्याचे दिसुन येत असल्याने दप्तरी दाखल करण्यात आले आहे.
(२) व (३) मे. शिवम डेव्हलपर्सचे विकासक श्री.रामचंद्र मांजरेकर असून गैरअर्जदार हे जमीनमालक आहेत. त्यांच्यात मौजे पडघा, शिवधाम पार्क, कुरूंद रोड, अर्जुनली गाव, ता.भिवंडी, जि.ठाणे या सदनिकेच्या विकास कामावरुन आपसात वाद आहेत.
मे. शिवम डेव्हलपर्स तर्फे रामचंद्र दत्ताराम मांजरेकर यांनी समक्ष पडघा पोलीस ठाणे येथे दिनांक ०५/१०/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन जमिनमालक रामचंद्र कृष्णा कोर यांच्याविरुध्द दिनांक ०६/१०/२०२१ रोजी अदखलपात्र गु. रजि.नं. ७४१/२०२१, भा.दं. वि. सं. कलम ५०६ प्रमाणे दाखल करुन तक्रारदारास मा.न्यायालयात दाद मागण्याची समज देण्यात आली आहे.रामचंद्र मांजरेकर यांनी पडघा पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०६/०२/२०२४ रोजी अदखलपात्रगु.र.नं.०१६०/२०२४भा.दं.वि.स.कलम ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांना मा.न्यायालयात दाद मागण्याची समज देवून सामनेवाला रामचंद्र कृष्णा कोर यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४९ प्रमाणे नोटीस दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दंत रुग्णालयातील वसतिगृहाच्या मजल्यावर लागलेल्या आगीच्या घटनेची चौकशी करण्याबाबत

**(१६) २३६६३ (१६-०७-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दंत रुग्णालयातील नवीन इमारतीतील वसतिगृहाच्या मजल्यावर लागलेल्या आगीमुळे वीज पुरवठा खंडित झाल्याने विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून, यास्तव निवासी डॉक्टरांनी दिनांक १५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास अचानक काम बंद आंदोलन केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आगीच्या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे तसेच रुग्णालयात सदोष विद्युत प्रणाली बसविणाऱ्या कंत्राटदारावर, तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.

नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाच्या नवीन इमारतीतील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात दिनांक ०६/०४/२०२४ रोजी आग लागली होती. वसतिगृहातील खोलीत आग लागल्याने झालेल्या गैरसोयीमुळे विद्यार्थ्यांनी दिनांक १५/०४/२०२४ रोजी काम बंद आंदोलन केले होते.

(२) व (३) नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाच्या नवीन विस्तारीत इमारतीत दिनांक ०६/०४/२०२४ रोजी लागलेल्या आगीच्या अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, मुंबई निरिक्षण विभाग, मुंबई सेंट्रल या विभागामार्फत दिनांक ०७/०४/२०२४ रोजी केली आहे. तसेच सदर आगीच्या घटनेची वरिष्ठ अग्निशमन अधिकाऱ्याद्वारे चौकशी करण्यात आली असून आगीच्या घटनेचे कारण सदोष विद्युत प्रणाली असे आढळुन आले. याप्रकरणी कंत्राटदारावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

## आर्य वैश्य (कोमटी) समाजाला ओबीसीमधून आरक्षण न देण्याबाबत

**(१७) २३७५० (२२-०७-२०२४) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्य वैश्य (कोमटी) समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाकडून पूर्व विदर्भातील नागपूर, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात सर्वेक्षण करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्य वैश्य (कोमटी) समाजाची विशेष मागणी नसतानाही हे सर्वेक्षण करण्यात आले असून, राज्यात ५८ टक्के ओबीसी समाजाला अल्प आरक्षण दिले जाते, त्यात आर्य वैश्य (कोमटी) समाजाचा समावेश करणे म्हणजे ओबीसी समाजावर अन्याय आहे, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लागू देता स्वतंत्र आरक्षण द्यावे, अशी ओबीसी संघटनांची भूमिका असून आर्य वैश्य (कोमटी) समाजाला ओबीसीमधून आरक्षण न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२८-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आर्य वैश्य (कोमटी) समाजाची इतर मागास प्रवर्गात समावेश करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगास प्राप्त आहे. या समाजास इतर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाला धक्का न लागू देता स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) २३९९२ (१६-०७-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असून सदर पदे तातडीने भरावीत यासाठी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेने मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखी परीक्षेतील गुणांची अट शिथिल करून निम्न संवर्गाची ११७८ रिक्त पदे प्रवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणाप्रमाणे भरावीत तसेच उर्वरित उमेदवारांची प्रतीक्षा यादी जाहीर करावी अशी

मागणी देखील करण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०९-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) कार्यकारी सहायक संवर्गातील निम्नसंवर्गातील कर्मचाऱ्यांमधून खात्यांतर्गत निवड पध्दतीने भरावयाची ११७८ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक १२/०८/२०२३ रोजी मे. आय.बी.पी.एस. संस्थेमार्फत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली. त्यानुसार तात्पुरत्या निवडसूचीमधील उमेदवारांच्या सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे यांच्या पडताळणीनंतर दिनांक १५/०२/२०२४ अन्वये अंतिम निवडसूची प्रसारित करण्यात आली.

सदर परिक्षेमध्ये ९० गुण मिळविणाऱ्या सर्व उमेदवारांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे यांची पडताळणी करण्यात येऊन निवडीचे निकष पूर्ण करणाऱ्या ८४३ उमेदवारांना नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यात आले. त्यापैकी २८ उमेदवारांनी नियुक्ती नाकारली असून १० उमेदवार चौकशी, प्रसुतीरजा ई. कारणांमुळे कार्यमुक्त न झाल्यामुळे नियुक्तीसाठी उपलब्ध झालेल्या ८०५ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

त्यामुळे सदर भरतीप्रक्रियेमध्ये प्रतिक्षा यादी तयार करण्यासाठी ९० गुण मिळविणारे उमेदवार शिल्लक नसल्यामुळे प्रतीक्षायादी तयार करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोट्यावधी रूपयांच्या पाण्याच्या टाक्या उभारूनही दिवा व बेतवडे (जि.ठाणे) गावास रुपये खर्च करून पाणीपुरवठा होत नसल्याबाबत

**(१९) २४०४८ (१४-०८-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करुन बारा वर्षापूर्वी दिवा व बेतवडे (जि.ठाणे) या गावात पाण्याच्या टाक्या उभारल्या असून अद्याप या टाक्यांचा वापर करण्यात आला नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेचा पैसा खर्च करून उभारलेल्या पाण्याच्या टाक्यांचा वापर न केल्यामुळे तेथील रहिवाशांना रोज पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे तसेच आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिवा व बेतवडे गावातील नागरिकांना पाण्याच्या टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याने या टाक्या बांधूनही त्याचा वापर न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०९-२०२५) :** (१) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार दिवा प्रभाग समिती अंतर्गत बेतवडे येथे रुपये १.७८ कोटी इतकी रक्कम खर्च करुन १.५ द.ल.लि. साठवण क्षमतेचे २ जलकुंभ सन २०११ मध्ये बांधण्यात आले आहेत. सदर जलकुंभातून म्हातार्डी, बेतवडे व दातिवली गावांना पाणीपुरवठा करणे प्रस्तावित असून दिवा विभागास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा ठाणे महानगरपालिका देते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या निळजे येथील संयोजनावरुन दिवा गावास पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीची वहन क्षमता व पाण्याचा दाब कमी असल्याने बेतवडे जलकुंभ भरण्यास सुमारे ५ तासांपेक्षा जास्त कालावधी लागत असल्याने सदर गावांना जलकुंभामधून होणारा पाणीपुरवठा बंद करुन थेट रित्या पाणीपुरवठा सुरु असल्याने सद्य:स्थितीत बेतवडे जलकुंभाचा वापर सुरु नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

दिवा मुख्य जलवाहिनी (८०० मी.मी. व्यासाची) अंशतः कार्यान्वित करुन पाण्याची वहन क्षमता व दाब वाढविण्यात आला आहे. सबब बेतवडे, म्हातार्डी व दातिवली परिसरामध्ये थेट रित्या पाणीपुरवठा केला जात असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध विशेष योजना लागू करुन सदर योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी विशेष तरतूद करण्याबाबत

**(२०) २४२४३ (१६-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने महिला वर्ग आणि दिव्यांगांसाठी महिला सुरक्षा अभियान, आनंद दिघे दिव्यांग अर्थसहाय्यक योजना, महिला बचत गटांना प्रती वर्षी १ लाख रुपये अर्थसहाय्य, बाळासाहेब ठाकरे शहरी हरितीकरण प्रकल्प इत्यादी विशेष योजना लागू करुन त्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तदतूद केली असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनांचे स्वरुप काय आहे, सदर योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, नसल्यास सदर योजनांची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे,

(३) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या महसुली अर्थसंकल्पामध्ये संचालक (नियोजन) या खात्यांतर्गत मुंबई महिला सुरक्षा अभियान या लेखाशिर्षा अंतर्गत रुपये १०० कोटी, धर्मवीर आनंद दिघे दिव्यांग अर्थसहाय्य योजना या लेखाशिर्षांतर्गत रुपये १११.८३ कोटी व महिला वस्तीस्तर संघाच्या विकासासाठी रुपये २.२७ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

(२) १. महिलांना स्वसंरक्षण करण्याकरीता प्रशिक्षण, शासनाच्या विविध योजनांबद्दल प्रचार प्रसिध्दी करणे. डिजीटल सुरक्षा ॲप बनविणे, संकटग्रस्त महिलांकरीता आवश्यक सर्व सुविधा एका छताखाली पुरविणे, महिलांकरीता असणारे कायदे याबाबत जागृती करणे, महिला सुरक्षेच्या अनुषंगाने इतर आवश्यक उपक्रम व उपाययोजना यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे महिलांच्या सुरक्षिततेकरीता नव्याने ॲप निर्मिती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
२. धर्मवीर आनंद दिघे दिव्यांग अर्थसहाय्य योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण ५९११५ निळे व पिवळे वैश्विक ओळखपत्रधारक (UDID CARD) ४० टक्के ते ८० टक्के दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना दर सहा महिन्याला रुपये ६०००/- या नुसार प्रति वर्ष एकूण रुपये १२,०००/- या प्रमाणे आणि ८० टक्यांवरील दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना दर सहा महिन्याला रुपये १८०००/- या नुसार प्रति वर्ष एकूण रुपये ३६,०००/- या प्रमाणे अर्थसहाय्य देण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत सद्य:स्थितीत एकूण ३२१८ पात्र दिव्यांग व्यक्तींचे अर्ज प्राप्त झाले असून त्यांना अर्थसहाय्य देण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे सुरु आहे.
३. केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान / जेंडर बजेट अंतर्गत महिला व बाल कल्याण योजनेंतर्गत स्थापन झालेल्या वस्तीस्तर संघांच्या विकासासाठी प्रति वस्तीस्तर संघांस प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये रुपये १,००,०००/- या प्रमाणे अनुदान देण्याची योजना बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ.विलास आठवले**
**नागपूर.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.